ISSN 2394-5303

# Printing Area

Issue-98, Vol-02, February 2023
Peer Reviewed International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned with CamScanner

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

February 2023, Issue-98, Vol-02

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg No U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell.07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

# Printing Area

www. विद्यावार्ता .कॉम

YouTube Channel


*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***


Indexed

IMPACT 9.001 iijif FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 3418002

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • International Multilingual Research Journal • ISO9001-2015 CERTIFIED

http://www.printingarea.blogspot.com





Scanned with CamScanner

13) Sports and 21st Century Learning Skills (the four C's)
Dr.Vishwambhar Jadhav- Ms. Neelam Bhandari ||57

14) The Concept of New Women Reflected in Anita Desai's 'Fire on the ......
Prof. Vilas A Pundkar ||60

15) CONTRIBUTION OF METASTRATEGIC KNOWLEDGE IN CONCEPTUAL ........
Mrs. Smitarani Behera-Prof. B.N. Panda ||62

16) औद्योगिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
किरण फुगारे, नांदेड ||68

17) प्रा. गणेश तेंडुलकरांचा काव्यसंग्रह 'प्राजक्त' : उत्कट जीवनानुभवाचे प्रगटीकरण
प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने ||72

18) आजचे शिक्षक आणि ई–लर्निंगचे व्यासपीठ
रविंद्र अरुण गुरव जिल्हा नंदुरबार, महाराष्ट्र ||75

19) महाराष्ट्र राज्य जल व्यवस्थापनाचा अभ्यास
डॉ कलंदर मुस्तफा पठाण ||78

20) संत साहित्यातील भक्ती विचार
प्रा.डॉ.रामकृष्ण ज्योतिबा प्रधान ||81

21) हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामातील आजेगावचा रणसंग्राम आणि हुतात्मा बहिर्जी शिंदे
प्रा.डॉ.संजय रामराव सोमवंशी ||83

22) हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीत की ग्राम मूर्च्छना वर्गीकरण पद्धति का विस्तृत अध्ययन
डॉ. अमनदीप कौर ||90

23) पंचायती राज एवं महिला सशक्तिकरण
अमरनाथ–डॉ० प्रवीण कुमार मिश्र ||95

24) वर्तमान समाज में वृद्ध महिलाओं की सामाजिक समस्याएं
राजन कुमार आर्य -डा० प्रवीण कुमार मिश्र ||98

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

**19**

# महाराष्ट्र राज्य जल व्यवस्थापनाचा अभ्यास

**डॉ कलंदर मुस्तफा पठाण**
भूगोल विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय
शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड

***********

महाराष्ट्र राज्य नैसर्गिक रित्या संपन्न राज्य आहे. परंतु या राज्याच्या सर्व भागांमध्ये नैसर्गिक परिस्थिती सारखी नाही काही भागांमध्ये निसर्ग संपन्नता पहावयास मिळते तर काही भागात रुक्षता व अवर्षण प्रवण परिस्थिती पहावयास मिळते हा निसर्गाचा प्रादेशिक असमतोल राज्यामध्ये पहावयास मिळतो त्यामुळे वाढती लोकसंख्या व दरडोई पाण्याची उपलब्धता याच्यामध्ये समतोल साधने राज्याला अवघड बनले आहे. यातच वाढत चाललेली दरी वाढते शहरीकरण व औद्योगीकरण यामुळे जल व्यवस्थापनावरील ताण व खर्च वाढत चालला आहे आजच्या काळामध्ये जल व्यवस्थापन हे प्रत्येक राज्याच्या व देशासमोरील एक एक प्रमुख आव्हान ठरले आहे. जल धोरणात पाण्याचे नियोजन संवर्धन व वितरण हे घटक महत्त्वाचे आहे पृथ्वीवरील सर्व क्रिया प्रतिक्रिया ह्या पाण्याशी निगडित आहे. जसे पिण्याचे पाणी सिंचन औद्योगीकरण उत्पादन वीज निर्मिती बांधकाम वन संवर्धन जैवविविधता इत्यादी निसर्गातील सर्व क्रियांचे व विकास यासाठी पाण्याची गरज आहे.

सप्टेंबर २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रातील १९३ सदस्य राष्ट्रांनी पुढाकार घेऊन पुढील पंधरा वर्षात साध्य करावयाच्या सतरा शाश्वत विकास उद्दिष्टं करिता करारबद्ध झालेले आहे. यामध्ये प्रमुख उद्दिष्ट म्हणजे "सर्वांसाठी शुद्ध जल व स्वच्छता" हे शाश्वत विकास करण्यासाठी व मानवी जीवन सुरक्षित करण्यासाठी महत्त्वाचा उद्देश आहे. यावरून असे स्पष्ट होते की जल हा घटक संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यसूची वर स्पष्टपणे आलेला आहे. हे आरोग्यपूर्ण जीवन सुनिश्चित करणे, भुकेची समस्यांना पूर्णतः बिमोड करणे, आर्थिक सुबत्ता व पर्यावरण पूरक औद्योगिक विकास यासह इतर उद्दिष्टे सुद्धा पाण्याशिवाय पूर्ण करता येणार नाही. यासोबतच निसर्गातील नैसर्गिक घटक यांना वापर समय सुरक्षित व सद्सद्विवेकबुद्धी ने वापर करावा. यासोबतच निसर्गातील ज्या वेगवेगळ्या परिसंस्था आहे त्या परिसंस्थेना देखील संतुलित विकास करणे गरजेचे आहे. यांच्या विकासाबरोबरच ती सौरक्षित व पुनर्स्थापित करणे जंगलाचे शाश्वत व्यवस्थापन, वाढत्या वाळवंटीकरण आला आळा घालणे, जैवविविधतेचा होणारा रास थांबवणे या बाबी देखील महत्त्वाचे आहे. अशा पद्धतीने शाश्वत विकास हा दिलेल्या उद्दिष्टांची ती मांडणी करण्यात आलेली आहे. ध्येय साध्य करण्यासाठी जल संपत्तीचा विकास व व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :–

१. राज्याच्या जल धोरणाचा अभ्यास करणे.
२. जल संवर्धनला विशेष प्राधान्य देणे.
३. पाण्याची न्याय वाटप करणे.
४. पाण्याची मागणी व पुरवठा यामधील असमतोलाचा अभ्यास करणे.

## संशोधनाची ग्रहीतके :–

(१) राज्याच्या जल धोरणाची माहिती प्राप्त होते.
(२) जलसंवर्धनला ऊर्जा मिळते व महत्व प्राप्त होते
(३) ती पाण्याची सर्वासाठी उपलब्धता करणे सोपे होते.
(४) पाण्याचा योग्य वेळी व योग्य जागी वापर लक्षात येतो.

## संशोधन पद्धती :–

सदरील संशोधन लेखामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती गोळा करून विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला



Scanned with CamScanner

आहे.

**संशोधन विधान :–**

"महाराष्ट्र राज्य जल धोरणाचा अभ्यास"

**अभ्यास क्षेत्र :–**

सदर शोध निबंध साठी महाराष्ट्र राज्य ची निवड करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य हे भारतातील अग्रगण्य राज्यांमध्ये गणले जाते या राज्यांमध्ये सर्वप्रथम जल धोरणाची सुरुवात २००३ मध्ये करण्यात आली. यात पू'र व अवर्षणाच्या समस्ये बरोबरच वाढते शहरीकरण व औद्योगीकरण सिंचनाच्या समस्या व इतर पाण्याशी निगडित समस्यांचा विचार न करता या जल धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली परंतु या जल धोरणांमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या त्यामुळे २००३ च्या जल धोरणाचा हे अडावा २०११ मध्ये घेण्यात येऊन त्यात थोड्याफार प्रमाणात बदल करून २०१२ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय जल धोरण जाहीर केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याने देखील राष्ट्रीय जल धोरणाची सुसंगत व्यापक आणि लवचिक जल धोरण २०१९ मध्ये तयार केले. यालाच "महाराष्ट्राची जलनीती–२०१९" असे म्हणतात या नव्या जल धोरणानुसार जल आराखडे तयार करताना महाराष्ट्र जल मंडळ व राज्य जल परिषद यांच्या मान्यतेशिवाय जल आराखड्यातील कामे करता येणार नाही . अशी तरतूद करण्यात आली. या जलनितीत राज्यातील जलक्षेत्रात समोरील पाण्याची मागणी व पुरवठा या मधील वाढते असंतुलन, पाण्याच्या उपलब्धतेची निश्चितता व वापरावरील मर्यादा पूर व अवर्षणाची समस्या जलक्षेत्र ची कार्यक्षमता, त्याची सिंचनक्षमता व पाण्याचा प्रत्यक्ष वापर यातील तफावत, भूजलात दिवसेंदिवस होणारी घट, नागरी व ग्रामीण भागातील जलवितरण प्रणाली, पाण्याच्या गुणवत्तेत दिवसेंदिवस खालवनारा दर्जा, नैसर्गिक जलसाठे, आणि नदी–नाले तलाव यांच्या कार्यक्षेत्रात होणारी अतिक्रमणे अशा अनेक समस्या व आव्हाने राज्यासमोर आहे या अहवालाचा विचार करून. राज्याने नवीन जलनीती तयार करताना राज्यात शुद्ध जल व स्वच्छता याची सुनिश्चितता करणे. पाणी टंचाई व अवर्षणास सामोरे जाण्यासाठी आवश्यक स्थितिस्थापकता (रेजिलियन्स) निर्माण करणे. विविध पाणी वापर घटकांमध्ये समन्यायी पद्धतीने पाण्याची क्षेत्रीय वाटप करणे. पाण्याचे समन्यायी वाटप करून वाटप केलेल्या पाण्याची हमी देणे. त्यावर आधारित परिसंस्थाने संरक्षण करणे. भूपृष्ठ जल व भूजल यांच्या दर्जाची संरक्षण करणे. उपलब्ध पाण्याची उत्पादकता व कार्यक्षमता यात वाढ करणे. सुयोग्य सुधारणा सह जलसंपत्ती विकास करून एकात्मिक जलसंपत्ती व्यवस्थापनाकडे पद्धतशीरपणे संक्रमण करणे. ही उद्दिष्टे ठरवण्यात आली तसेच मूलभूत समस्या तत्वे आणि एकिकृत राष्ट्रीय दृष्टिकोन लक्षात घेऊनउन राष्ट्रीय जल नीती च्या धर्तीवर तसेच जलक्षेत्रांमधील राज्य सापेक्ष समस्या व आव्हाने यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने राज्याच्या २००३ च्या जलनीतीत सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र राज्य जलनीती २०१९ ला शासनाची मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य जलनीती २०१९ राज्यातील पाण्याची उपलब्धता प्रदेशानुसार विषम प्रमाणात आहे काही भागांमध्ये पाण्याची उपलब्धता जास्त तर काही भागात अत्यल्प आहे काही भागांमध्ये पाणी पिण्यासाठी ही उपलब्ध होत नाही. राज्याच्या बऱ्याच भागांमध्ये पर्जन्यछायेच्या प्रदेशात मुळे बराच भाग अवर्षण प्रवण क्षेत्रात मोडतो तर काही भाग अतिवृष्टीने ग्रासलेला असतो वातावरणातील बदलांच्या संभाव्य धोक्यामुळे परिस्थिती बिकट होत चालली आहे पाणी हा राज्याच्या सूचीमधील विषय असल्यामुळे महाराष्ट्र राज्याने आपली स्वत:ची जलनेती प्रथमत: २००३ मध्ये तयार केली त्यानंतर त्यात मे २०११ मध्ये अंशत: सुधारणा करून या जल नीतीचा अवलंब केला व त्यातून राज्याच्या जल विकासात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडू लागले त्याचबरोबर जलक्षेत्रात भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने उद्यापर्यंत कायम आहे. त्यामुळे जलक्षेत्रात धोरणात्मक सुधारणा करणे गरजेचे आहे ही पार्श्वभूमी विचारात घेऊन भारत सरकारने जलनीती मध्ये सुधारणा करण्याची सुचित



Scanned with CamScanner

केले त्यामुळे राज्य सापेक्ष समस्या व आव्हाने यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय जलनीती त्या धर्तीवर राज्य जलनीती सुधारणा करण्यात आल्या त्यालाच महाराष्ट्र राज्य जलनीती २०१९ असे म्हणतात. राज्य जलनीती धोरणाची व्याप्ती ही जलनीती राज्य शासनाने पाण्याशी संबंधित सर्व विभाग, राज्यातील निमशासकीय अभिकरणे, स्थानिक संस्था पाण्याचा वापर करणारी राज्यातील सर्व यंत्रणा, नागरिक यांचा समावेश या जलनीती धोरणामध्ये करण्यात आला.

**राज्य जल धोरण उद्दिष्टे :—**

१. राज्यात शुद्ध जल व स्वच्छता याची सुनिश्चित ता करणे.

२. पाणी टंचाई व अवर्षणास समोरे जाण्याची कुवत निर्माण करणे.

३. पाणी वाटपामध्ये न्यायिक पाण्याची क्षेत्रीय वाटप करणे.

४. वाटप केलेल्या पाण्याची हमी देणे.

५. सभोवतालच्या परिसंस्थेचे संरक्षण करणे.

६. भूजल व भूपृष्ठ जन यांच्या गुणवत्तेत वाढ करणे.

७. पाण्याची उत्पादकता व कार्यक्षमता यांच्यात वाढ करणे.

**राज्य जलनीती च्या केंद्रस्थानी असलेले विषय :—**

(१) जल व्यवस्थापनामध्ये लाभधारकांच्या सहभागाची सुनिश्चित करणे.

(२) धोरणात्मक नियोजन व गुंतवणुकीबाबत प्राधान्य देणे.

(३) धोरणांची अद्यावतीकरण करणे.

(४) मागणी व पुरवठा यांचे व्यवस्थापन करणे.

(५) पाणी वापरात सुधारणा करणे.

(६) वापरायोग्य पाण्याची प्रमाण वाढवणे.

**उपाय योजना :—**

(१) लाभधारक का चा सहभाग वाढवणे.

(२) क्षेत्रीय वाटप व्यवस्थित करणे.

(३) एकात्मिक जल आराखडा तयार करणे.

(४) जलसंपत्तीचे योग्य नियोजन करणे.

(५) पाण्याची मागणी व पुरवठा यांच्यातील तफावत कमी करणे.

(६) पाण्याची गुणवत्ता वाढवणे.

(७) जलसंवर्धन करणे.

(८) घरगुती व औद्योगिक पाणी वापराचे नियोजन करून व्यवस्थापन करणे.

(९) भूजल विकास व व्यवस्थापन करणे.

(१०) अवर्षणाचा प्रभाव कमी करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे जल संवर्धन करणे.

(११) समाजामध्ये जनजागृती करून समाजाला जलसंवर्धन करण्यासाठी प्रवृत्त करणे.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**


१. माझे गाव माझे तीर्थ, अण्णा हजारे, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी राळेगण सिद्धी, ता. पारनेर जि. अहमदनगर

२. पाणी आडवा पाणी जिरवा, हेमराज शहा, रिया पब्लिकेशन कोल्हापूर.

३. कृषी विकास व आधुनिक सिंचन पद्धती, डॉ मदन शिंदे, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.

४. वॉटर्शेड डेव्हलपमेंट प्रोग्राम इन डॉट पॉन येरीया, राकेश कुमार, अध्ययन प्रकाशन न्यू देहली.

५. जल जीवन का आधार, कृष्ण कुमार मिश्र, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया.


⌘⌘⌘



Scanned with CamScanner